केसरी
www.dailykesari.com
पुणे, ९ फेब्रुवारी २०२३
@kesarinewspaper


# विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करावे

## खासदार चिखलीकर यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर बदलत्या शैक्षणिक पद्धतींचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन नांदेडचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी महाराष्ट्र केसरी विजेते पैलवान शिवराज राक्षे, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राजमाला बुट्टेपाटील, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, राजाराम लोखंडे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी.दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

पै. शिवराज राक्षे यांचा खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मानाची गदा व १ लाख १ हजार १११ रुपये




राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी पै. शिवराज राक्षे व गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करताना खासदार प्रताप पाटील चिखलीकर, देवेंद्र बुट्टेपाटील व मान्यवर

देण्यात येऊन नागरी सत्कार करण्यात आला. खेड तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीनेही पै. शिवराज राक्षे यांना १ लाख रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणात गुणवत्तापूर्ण बदल होणार असून विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून वाटचाल करावी, असे सांगितले. स्पर्धेच्या युगात खडतर परिश्रमाशिवाय यश नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी उद्याच्या आव्हानांना आत्मविश्वाने सामोरे जाताना समाजाच्या विविध क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांनी संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल आनंद व्यक्त केला.

महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे म्हणाले की, मेहनत व शिस्तीने केलेल्या सरावाने मला यश मिळाले असून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी मेहनतीची कठोर तपश्चर्या करावी असे आवाहन केले.